E:\Ajit 20.12.79\DOCKET SHEET


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

**राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर (म. रा.)**

mpkv.ac.in
registrar.mpkv@nic.in
arofm01@gmail.com
vipghmpkv@gmail.com

Registrar Office (०२४२६) २४३२१६ २४३८१६
AR Ofm Office (०२४२६) २४३२२२
VIP Guest House (०२४२६) २४३३५८ २४३२१२


जा. क्र. /कुलसचिव कार्यालय / बांधकाम/ लोकलसमिती/२७३ /२०१७, दिनांक :- 29 MAR 2017

**वाचा :-** दिनांक १७/०१/२०१७ रोजीच्या अधिकारी बैठकीचे इतिवृत्त.

**आदेश**

ज्या अर्थी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी झालेल्या बांधकाम व विद्युतीकरणाबाबत सतत तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे बांधकाम व विद्युतीकरणाबाबतचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी सदर बाबीवर दिनांक १७.०१.२०१७ रोजी मा. कुलगुरु यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या अधिकारी बैठकीत चर्चा होवुन उचीत कार्यवाही करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्या अर्थी मा. कुलगुरु यांचे मान्यतेने खाली सही करणार विद्यापीठाचे गटनिहाय कामकाज विचारात घेवुन खालील प्रमाणे गटनिहाय स्थानिक समित्या गठीत करण्यात येत आहे.

**अ- संशोधन गट :-**

| अ.क्र. | अधिकारी तपशील | पदनाम |
|---|---|---|
| १ | संचालक संशोधन | अध्यक्ष |
| २ | संबंधीत विभागातील सहयोगी संशोधन संचालक | सह-अध्यक्ष |
| ३ | ज्या संशोधन केंद्राचे / कार्यालयाचे बांधकाम व विद्युतीकरण चालु असेल त्या केंद्राचे / कार्यालयाचे प्रभारी अधिकारी / कार्यालय प्रमुख | सदस्य |
| ४ | ज्या विभागाचे कामचालु असेल त्या विभागातील सहाय्यक नियंत्रक / लेखा विषयक कामाचे ज्ञान असलेला कर्मचारी (राहुरी करीता सहाय्यक नियंत्रक-३) | सदस्य |
| ५ | संबंधीत कार्यालयाचे / विभागाचे स्थापत्य अभियंता (राहुरी करीता विद्यापीठ अभियंता कार्यालयातील स्थापत्य अभियंता) | सदस्य सचिव |

**ब-उच्च शिक्षण गट :-**

| अ.क्र. | अधिकारी तपशील | पदनाम |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण | अध्यक्ष |
| २ | संबंधीत महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता | सह-अध्यक्ष |
| ३ | संबंधीत महाविद्यालयाचे सहाय्यक नियंत्रक | सदस्य |
| ४ | संबंधीत महाविद्यालयाचे सहाय्यक-कुलसचिव | सदस्य |
| ५ | संबंधीत महाविद्यालयाचे स्थापत्य अभियंता | सदस्य सचिव |

E:\Ajit 20.12.79\DOCKET SHEET

**क- विस्तार शिक्षण गट :-**

| अ.क्र. | अधिकारी तपशील | पदनाम |
|---|---|---|
| १ | संचालक विस्तार शिक्षण | अध्यक्ष |
| २ | प्रभारी अधिकारी विभागीय विस्तार केंद्र | सह-अध्यक्ष |
| ३ | कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र | सदस्य |
| ४ | संबंधीतील विभागातील सहाय्यक नियंत्रक | सदस्य |
| ५ | संबंधीत विभागातील स्थापत्य अभियंता | सदस्य सचिव |

**ड- निम्न कृषि शिक्षण गट :-**

| अ.क्र. | अधिकारी तपशील | पदनाम |
|---|---|---|
| १ | सहयोगी अधिष्टाता (निकृशि) | अध्यक्ष |
| २ | संबंधीत कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य | सह-अध्यक्ष |
| ३ | संबंधीत कृषि तंत्र विद्यालयातील कनिष्ट / वरिष्ठ संशोधन सहाय्यक | सदस्य |
| ४ | लेखा विषयक कामाचे ज्ञान असलेला संबंधीत कृषि तंत्र विद्यालयाचा कर्मचारी | सदस्य |
| ५ | संबंधीतील विभागातील स्थापत्य अभियंता | सदस्य सचिव |

उपरोक्त गठीत करण्यात आलेल्या समित्यांचे अनुषंगाने नमुद करण्यात येते की, ज्या बांधकामाचा तसेच विद्युतीकरणाचा एकुण खर्च (प्रत्येक) रु. २५.०० लाखाहुन अधिक असेल त्याकरीता समितीमधील अ.क्र. १ वरील अधिकारी समितीचे अध्यक्ष असतील आणि ज्या बांधकामाचा व विद्युतीकरणाचा एकुण खर्च (प्रत्येक) रु. २५.०० लाखापर्यंत असेल त्याकरिता समितीमधील अ.क्र. २ वरील अधिकारी समितीचे अध्यक्ष असतील. यामध्ये सर्व प्रकारची बांधकाम उदा. इमारत, रस्ते, सीमाभिंत, रंगकाम, फर्निचर, नुतनीकरण,विद्युतीकरण, तारेचे व जाळीचे कुंपण, प्रक्षेत्रावरील गोदाम, खळे इत्यादी कामांचा समावेश आहे.

**उपरोक्त समितीने खालील मुद्दे विचारात घेवुन वेळोवेळी त्यांचा अहवाल लेखी स्वरुपात कुलसचिव कार्यालयास सादर करावा.**

१. बांधकामाच्या व विद्युतीकरणाच्या टिकाणी वेळोवेळी भेटी देवुन प्रत्यक्ष पाहणी करावी.

२. बांधकामाचा व विद्युतीकरणाचा दर्जा व गुणवत्ता, तसेच बांधकाम व विद्युतीकरणा संबंधीच्या मालाचा दर्जा व गुणवत्ता आणि कच्च्यामालाचे बांधकामासाठी असलेले प्रमाण तसेच बांधकामाच्या water curring इत्यादीची खातरजमा समितीतील स्थापत्य अभियंता यांचे मार्फत करुन घेणे.

३. बांधकाम / विद्युतीकरण हे निर्धारित वेळेत पुर्ण होणे विषयी खात्री करणे व आवश्यक तेथे उपाययोजना सुचविणे.

४. चालु असलेले बांधकाम व विद्युतीकरण आराखडयानुसार तसेच बांधकामासाठी ठरविलेल्या तपशीलाप्रमाणे व विद्युतीकरणाच्या ठरलेल्या तपशीलाप्रमाणे (Plan Estimates), आणि कामाच्या आदेशात नमुद केलेल्या अटी / शर्ती नुसार चालु आहे किंवा नाही याची खातरजमा करणे.

E:\Ajit 20.12.79\DOCKET SHEET

समितीचा अहवाल प्रतिकुल आल्यास व निकृष्ट दर्जाचे बांधकाम / विद्युतीकरण होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

वरील आदेश विद्यापीठ हितार्थ काढण्यात आलेले असुन त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(गणेश घोरपडे)
कुलसचिव

प्रत - सर्व समिती अध्यक्ष व सदस्य मफुकृवि, राहुरी
प्रत - मा.कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी